वाचले-

१. मा.अंशकालीन प्राचार्य, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड, पुणे – १९ यांचेकडील पत्र क्र.औप्रसंपिंचि/शिप्रया/२०१८-१९/१८७५, दि.२४/०८/२०१८.

२. जाहीर प्रकटन क्र.प्रशा/११/कावि/६५३/२०१९, दि.१३/०९/२०१९ अन्वये प्रसिध्द जाहिरात.

३. पत्र क्र.प्रशा/१०/कावि/५८३/२०१९, दि.१७/०९/२०१९ चे पत्रानुसार टेबल क्र.१० कडून प्राप्त आरक्षण.

४. दिनांक ०३/१२/२०१९ चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.
प्रशासन विभाग
क्र.प्रशा/११/कावि/७७४/२०१९.
दि. ०४/१२/२०१९.

**विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम -१९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या नेमणूकीबाबत...**

**आदेश,**

वाचले क्र.१ अन्वये कळविणेत आलेनुसार शिकाऊ उमेदवाराच्या १२ व्यवसायासाठी एकूण २३६ जागा उपलब्ध आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत सन-२०१९-२० चे सत्राकरीता शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करण्यास वाचले क्र.२ अन्वये अर्ज मागविणेसाठी महापालिका संकेतस्थळावर जाहिर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्जातील पात्र उमेदवारांची आय.टी.आय. पात्र परिक्षेतील प्राप्त गुणानुक्रमानुसार तसेच वाचले क्र.३ अन्वये आरक्षणानुसार सन २०१९-२० या सत्राकरीता खालील शिकाऊ उमेदवारांची आरक्षण व गुणानुक्रमानुसार नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम | एकूण जागा | प्राप्त अर्ज | पात्र अर्ज | प्रशिक्षण कालावधी | उ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | | | | | 1. | अघमे सागर बळवंत | अनु.जाती | 77.21% |
| 2) | | | | | | 2. | वानखेडे आशिष विनोद | अनु.जाती | 77.07% |
| 3) | | | | | | 3. | लोखंडे शरद कवडू | अनु.जाती | 75.71% |
| 4) | | | | | | 4. | भांगरे समीर नवनाथ | अनु.जमाती | 80.71% |
| 5) | | | | | | 5. | दोडके प्रफुल्ल शामराव | अनु.जमाती | 72.79% |
| 6) | | | | | | 6. | चव्हाण अजय दिनकर | वि.जा.(अ) | 68.21% |
| 7) | | | | | | 7. | भामोद्रे आकाश राजेश | भ.ज.(ब) | 70.29% |
| 8) | | | | | | 8. | धापसे भागवत बप्पासाहेब | भ.ज.(क) | 68.86% |
| 9) | | | | | | 9. | सावरबांधे पवन मोरेश्वर | इमाव | 77.00% |
| 10) | प्लंबर | 25 | 92 | 46 | 1 वर्षे | 10. | पेटले गोपाल रघुनाथ | इमाव | 74.79% |
| 11) | | | | | | 11. | देवरे राहुल बळीराम | इमाव | 73.36% |
| 12) | | | | | | 12. | नुर मो अ. अजीज शेख | इमाव | 71.07% |
| 13) | | | | | | 13. | बोरकर राजेंद्र हेमराज | इमाव | 67.00% |
| 14) | | | | | | 14. | कागदे अमोल विक्रम | खुला | 76.79% |
| 15) | | | | | | 15. | कोटग्याळे दस्तगीर महाबोदिन | खुला | 76.21% |
| 16) | | | | | | 16. | शेख सद्दाम मंजूर | खुला | 74.07% |
| 17) | | | | | | 17. | अहिरे सौरभ मधुकर | खुला | 72.50% |
| 18) | | | | | | 18. | ठाकरे आदित्य निवृत्ती | खुला | 69.93% |
| 19) | | | | | | 19. | शेख सलिम विलियास | खुला | 68.86% |
| 20) | | | | | | 1. | कांबळे आनंद मिलिंद | अनु.जाती | 77.57% |
| 21) | | | | | | 2. | बावने रंजिता रमेश | अनु.जाती | 64.29% |
| 22) | | | | | | 3. | डोंगरे आशिष प्रकाश | अनु.जमाती | 79.07% |
| 23) | | | | | | 4. | पांडे अविनाश रमेशराव | इमाव | 77.71% |
| 24) | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 15 | 65 | 25 | 1 वर्षे | 5. | बाळापूरे गौरव विनोदराव | इमाव | 76.71% |
| 25) | | | | | | 6. | वाघमारे अमोल महादेवराव | इमाव | 76.36% |
| 26) | | | | | | 7. | जाधव लक्ष्मण दिलीप | खुला | 79.71% |
| 27) | | | | | | 8. | पोंगाडे श्रीधर राजेश | खुला | 77.86% |
| 28) | | | | | | 9. | मंगवानी जय संजय | खुला | 70.14% |
| 29) | | | | | | 10. | देवतारे शुभम पुरुषोत्तम | खुला | 62.00% |

मागील प्रमाणे नेमणूक करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवारांकरीता प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१) Web site :- WWW.APPRATICESHIP.GOV.IN (DGET MIS PORTAL) यावरील उमेदवारांचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. व्यावसायिक प्रशिक्षणार्थी म्हणून या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक पूर्णत: तात्पुरती, एक वर्ष व १२ वी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची नेमणूक सहा महिने अशा निश्चित कालावधीसाठी आहे. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात येईल. नेमणूक देण्यात आलेल्या उमेदवार प्रशिक्षणार्थींचा व्यावसायिक पदावरील महापालिका आस्थापनेवर कोणताही हक्क राहणार नाही.

२) सदरची नेमणूक ही उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व तांत्रिक पात्रता आय.टी.आय. उत्तीर्ण तसेच शाळेचे, जातीचे, आधारकार्ड, MIS पोर्टलवरील रजिस्ट्रेशन इत्यादी प्रमाणपत्राच्या छायांकीत सत्यप्रती तपासून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास तसेच प्रशिक्षणार्थींनी आदेशातील अटी व शर्तींचा भंग केल्यास देण्यात आलेली नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

३) नेमणूक दिलेल्या शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थींनी महापालिकेच्या प्रशासन विभागामध्ये त्वरीत रूजू होऊन शाळेच्या, जातीच्या व शैक्षणिक अर्हतेच्या मूळ प्रमाणपत्रासह दोन प्रतीत सत्यप्रती, तसेच कॉन्ट्रॅक्ट फॉर्म स्वतंत्र तीन प्रतीत टंकलिखित (Type) करून साक्षीदारांच्या स्वाक्षरीने रूजू होताना सादर करणे आवश्यक राहील. कॉन्ट्रॅक्ट फॉर्म अपूर्ण तसेच खाडाखोड व चुकीचे असल्यास स्विकारले जाणार नाहीत. त्वरीत रूजू न झाल्यास कोणताही पत्रव्यवहार न करता तुमची नेमणूक रद्द करण्यात येईल.

४) शिकाऊ उमेदवारास नेमून दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. या कालावधीत कोणतीही तात्पुरत्या स्वरूपातील नोकरी इतरत्र करता येणार नाही.

५) प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणूक आढळून आल्यास त्यांस कोणतीही पूर्वसुचना अथवा नोटीस न देता प्रशिक्षणार्थी पदावरून कमी केले जाईल तसेच कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

६) शिकाऊ उमेदवारांना पुर्ण वर्षाकरीता ०८ दिवस किरकोळ रजा व १५ दिवस वैद्यकीय रजा अनुज्ञेय राहतील. तसेच दर तीन महिन्यानंतर वेगवेगळ्या विभागात तसेच क्षेत्रिय कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणे क्रमपात्र असणार आहे.

७) प्रशिक्षणाची वेळ ही संबधित कार्यालयाचे वेळेप्रमाणे राहील. सर्व शासकीय सुट्टया देय राहतील. उमेदवारांना शिफ्टमधील कामकाज देता येणार नाही. नेमणूक दिलेल्या व्यवसाय निहाय पदाचेच काम करणे बंधनकारक राहील अन्य कोणतेही कामकाज करता येणार नाही. तसे झाल्यास उमेदवार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार दाखल करू शकतील.

८) शिकाऊ उमेदवारांची संविदा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी,पुणे- १९ यांचे कार्यालयात कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन (रजिस्ट्रेशन) नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास त्यांची नेमणूक त्वरीत रद्द होऊन त्यांना परिक्षेस बसण्यास अडचण निर्माण होऊ शकते. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे यांचे आदेशानुसार उमेदवारांना कार्यमुक्त करण्यात येईल, याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, निगडी, पुणे-१९ यांचेमार्फत होणा-या परिक्षेस बसण्यास आवश्यक कागदपत्रांची तसेच परिक्षा फी ची पुर्तता संबधित उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे. त्याकरीता WWW.APPRATICESHIP.GOV.IN या संकेतस्थळावर माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे दरमहाची हजेरी पत्रकावरील उपस्थिती व विद्यावेतन जमा झालेल्या बँक पास बुकची छायांकीत प्रत संबधित शाखाप्रमुखांचे स्वाक्षरीने प्रशासनास सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव परीक्षेस बसता आले नाही तर त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१०) उमेदवारांनी नेमणूक दिलेल्या विभागात रूजू झाल्यानंतर स्वत:चे ओळखपत्र तसेच बँक पासबुक दोन दिवसात प्राप्त करून संबधित विभागास सादर करावे. त्याचप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून थंम्ब मशिनवर नोंद करून घ्यावी. आपल्याला देण्यात येणारे विद्यावेतन थंम्ब रिपोर्टवरून अदा करण्यात येणार असल्याने कार्यालयीन वेळेतच कार्यालयामध्ये उपस्थित रहावे व कार्यालयीन वेळेनंतरच कार्यालय सोडणे बंधनकारक राहील याची स्पष्ट नोंद घ्यावी.

११) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.९ फेब्रुवारी, २०१८ अन्वये शिकाऊ उमेदवारांना निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अनुज्ञेय राहील.

**सही/-**
**(मनोज लोणकर)**
**सहाय्यक आयुक्त, प्रशासन**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति,

व्यवसाय निहाय शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक देण्यात आलेले सर्व संबंधित उमेदवार यांचे माहितीकरीता महापालिका संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येईल.

प्रत – १. संगणक कक्ष (प्रशासन) - प्रसिध्दीकरीता.
२. लेखा विभाग.
३. मुलेप विभाग.
४. संबंधित विभाग.

शिकाऊ उमेदवारांना विभागाच्या रूजू दिनांकापासून बायोमेट्रीक थंम्ब हजेरी प्रमाणे विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात यावे. उमेदवारांना दरमहा द्यावयाचे विद्यावेतन, कामगार कल्याण विभागाकडून दर महा महिन्यांनी किमान वेतनाचे दर ६ महिन्यांनी प्रसिध्द करणेत येणा-या दरानुसार प्रशिक्षणाचे कालावधीनुसार एकूण अर्धकुशल किमान वेतनाचे ७०%, ८०%, ९०% याप्रमाणे विद्यावेतन प्रत्येक महिन्याचे पाच तारखे पर्यंत देणेत यावे. प्रशिक्षणार्थींना प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेपुर्वी बायोमेट्रीक थंम्ब हजेरी

प्रमाणे विद्यावेतन त्यांचे बँक खात्यामध्ये जमा केल्याचा पुरावा म्हणून बँक पासबुकची प्रत व बायोमेट्रीक हजेरीची छायांकीत प्रत शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांचे स्वाक्षरीने प्रशासनास सादर करावी. सदरची माहिती दर महिन्याचे ०५ तारखे पर्यंत सादर न केल्यास अथवा विलंबाने सादर केल्यास शासनाकडून मिळणा-या परताव्याच्या रक्कमेची सर्वस्वी जबाबदारी संबधित विभागाची राहील. प्रशिक्षणार्थींना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देण्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. व्यवसाय निहाय प्रशिक्षण देण्यात यावे त्यांच्यावर इतर कामे सोपविण्यात येऊ नयेत. प्रशिक्षणार्थींनी याबाबत मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार केल्यास त्यास संबधित जबाबदार राहतील. प्रशिक्षणार्थी सतत गैरहजर राहिल्यास तसेच कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्यास त्यांचेवर विभागप्रमुखांनी कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची प्रत प्रशासनास सादर करावी. कार्यालयात उशीरा हजर राहील्यास नियमानुसार रजा खर्ची टाकण्यात याव्यात. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या एक महिना आधी प्रशिक्षणर्थींची संपूर्ण वर्षाची उपस्थिती व विद्यावेतन त्यांचे बँक खात्यावर जमा झाल्याच्या पासबुकची छायांकीत प्रत आपले स्वाक्षरीसह प्रशासनास सादर केल्याची खात्री करावी अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता न आलेस सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची राहील. व्यावसायिक परिक्षेस बसण्यास आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून आपले मार्फत परिक्षा फॉर्मवर स्वाक्षरी देण्यात यावी.

मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कालावधी निश्चित केलेनुसार प्रशिक्षणार्थींना महापालिकेत नेमणूक दिल्याने त्यांचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होताच त्यांना विभागामार्फत कार्यमुक्त करण्यात यावे. उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित असल्याने त्यांच्या कालावधीत वाढ होणार नाही याची खबरदारी घेऊन कालावधीत वाढ करणेबाबतचे प्रस्ताव सादर करू नयेत.

५. **मा.अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र,द्वारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था पिंपरी चिंचवड, टेल्कोरोड, निगडी, पुणे-४११०१९.**
यांना माहितीकरीता सादर.

प्रशासन अधिकारी - २
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.